विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिकविद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा– ऑगस्ट २०२४

इयत्ता :बारावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : १ तास

दिनांक : ७/८/२०२४ | गुण : २०

सूचना : १. शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

---

विभाग १- व्याकरण

खालील शब्दांची भाववाचकनामे लिहा .

प्रश्न.1. कणखर 1

प्रश्न.2. उष्ण 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा..

प्रश्न. 3.आईच्या कष्टा<u>बरोबर</u> <u>माझ्या</u> वाढीला बळ दिलं ते भोवतीच्या या पोषक वातावरणानं. 2

विभाग २ - गद्य आणि पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका ओळीत लिहा.

प्रश्न. 4. संत नामदेवानी अभंगात आपल्या मनाची अवस्था व्यक्त करण्यासाठी कोणत्या पक्षाची प्रतिमा वापरली आहे? 1

प्रश्न. 5. कवी सावरकरांनी सागराला कसली शपथ घातली ? 1

खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य वापरुन पूर्ण करा.

प्रश्न. 6. वत्स न देखता गाई ________ । 1

( ओरडती , हुंबरती , रडती )

प्रश्न.7. मार्गज्ञ स्वयं मीच ________ वाहीन. 1

( पृष्ठि , वृष्टि, सृष्टी )

पश्न. 8. तेच ________ देखणे , जे कोंडिती सान्या नभा. 1

( ओठ , कान डोळे )

खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

प्रश्न. 9. " भाऊबीजेची ओवाळणी म्हणून तुला हे मोती आम्ही देणार आहोत !" 5

किंवा

' एका वाघाची मान गेंडयानं फाडली होती आणि दुसरा वाघही रक्तानं माखलेल दिसत होता.'

विभाग ३- लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

प्रश्न.10. हातभार लावणे ____________________ 1

अ. वश करुन घेणे

आ. मदत करणे

इ. त्रास होणे

ई. आनंद वाटणे

प्रश्न. 11. बार टाकणे ____________________ 1

अ. आक्रमणासाठी पुढे येणे

आ. शोध घेणे

इ. हल्ला करणे

ई. गोळी घालणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

गोमंतभूमीत जन्म घेतलेले आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाची तेजस्वी मुद्रा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उमटविलेले प्रकांड पंडित आणि बौद्ध धर्माचे उपासक आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी अखंड आयुष्यात ज्ञानमार्ग पत्करला. राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्रामातही त्यांनी स्वतःला झोकून दिले. महात्मा गांधींच्या असहकारितेच्या आंदोलनात ते सहभागी झाले. या कृतिशील प्रज्ञावंताने लिहिलेले 'निवेदन' हे आत्मचरित्र १९२४ मध्ये प्रसिद्ध झाले. मराठीतील लक्षणीय स्वरूपाच्या आत्मचरित्रामध्ये निवेदन या पुस्तकाचा आवर्जून उल्लेख केला जातो त्याला अनेक कारणे आहेत. धर्मानंदांच्या जडणघडणीचा आलेख या आत्मचरित्रात आहे. ज्ञानप्राप्तीसाठी त्यांना खडतर साधना करावी लागली. देशात आणि त्यांनी भ्रमंती केली.अनेक आपत्तीना तोंड देत त्यानी ध्येयप्राप्ती केली.मानवाच्या उन्नतीचा ध्यास घेऊन बौद्ध धर्माची स्थापना गौतमबुद्धाने केली होती. विशुद्ध नैतिकतेच्या पायावर आधारलेला हा धर्म, त्यातील नीतीतत्वांचा समग्रतेने धर्मानंदानी अभ्यास केला. ती प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यांची ही जीवननिष्ठा आणि अंगीकारलेली विचारधारा नंतरच्या पिढ्यांसाठी पथदर्शक ठरली.

प्रज्ञा आणि प्रतिभा

डॉ. सोमनाथ कोमरपंत

प्रश्न. 12. धर्मानंद कोसंबी कोणत्या धर्माचे उपासक होते ? 1

प्रश्न. 13. धर्मानंद कोसंबी यांच्या चरित्राचे नाव काय ? 1

प्रश्न.. 14. कोसंबीच्या कोणत्या गोष्टी भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल ? 1

प्रश्न. 15. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 1

||||||||||||||||||||||||||||||||||||||||